९ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
आरक्षण व सोडत काढण्याबाबतचा कार्यक्रम.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.-रानिआ/मनपा-२०२२/प्र.क्र. ४९/का.५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.

निवडणूक प्राथम्य

दिनांक :- २६ जुलै, २०२२

प्रति,
आयुक्त,
औरंगाबाद, लातूर, परभणी, चंद्रपूर,
पनवेल, मिरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर,
मालेगाव व नांदेड-वाघाळा महानगरपालिका.

विषय :- ९ महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२२
आरक्षण व सोडत काढण्याबाबतचा कार्यक्रम.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र. २१ /का.५
दि. २२ जुलै, २०२२ चे आदेश.

महोदय,

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) १९७५६/२०२१ मध्ये दि. १५ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन, जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाहीत, अशी तरतूद दि. २८ डिसेंबर, २०२१ च्या आदेशामध्ये केली होती.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका (सिव्हील) १९७५६/२०२१ मध्ये दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन आदेशान्वये महानगरपालिकांच्या सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण याबाबतचे दि. २८ डिसेंबर, २०२१ चे आदेश सुधारीत केले आहेत. त्यास अनुसरुन आता समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेल्या टक्केवारीच्या

